# सहकार व पणन विभाग

## १. सीआर/३२०/गडचिरोली/२०१४.

फिर्यादी हे शासकीय कंत्राटदार असून त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या अमर्याद रक्कमेचे काम करण्याचा परवाना प्राप्त केला आहे. कृषी उत्पन्न बाजार समीती, चामोर्शी, जिल्हा गडचिरोली येथील दुकानांचे गाळे, गोडावून बांधण्याचे काम २०१० पासून सुरु आहे. त्याबाबतची बिले मंजूरीसाठी कृषी उत्पन्न बाजार समीती, चामोर्शी यांचेकडे मंजूरीसाठी पाठविण्यात येतात. फिर्यादी यांनी केलेल्या कामाची बिले व भाव वाढीव रक्कमेची बिले सादर केली होती. सदरची बिले मंजूर करण्यासाठी आरोपी लोकसेवक अतुल गंगाधरराव गण्यारपवार, सभापती, कृषी उत्पन्न बाजार समीती, चामोर्शी यांनी कमिशन म्हणून फिर्यादी यांचेकडे रु.१३ लाख लाचेची मागणी केली. त्यानुसार रु. ५ लाख रोख रक्कम व रु. ८ लाखाचा धनादेश देण्याचे ठरले. दिनांक २३/०४/२०१४ रोजी फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन पडताळणी करण्यात आली. त्यात आरोपी लोकसेवक गण्यारपवार यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने सापळा आयोजीत करण्यात आला. आरोपी लोकसेवक मंगेश चंद्रशेखर राजापूरे, कनिष्ठ लिपीक, कृषी उत्पन्न बाजार समीती, चामोर्शी याने आरोपी लोकसेवक अतूल गंगाधर गण्यारपवार यांच्या सांगण्यावरुन फिर्यादी यांचेकडून रोख रक्कम रु. ५ लाख व रु. ८ लाख रक्कमेचा धनादेश स्वीकारताना पकडण्यात आले.

सदरबाबत चामोर्शी पोलीस ठाणे, जिल्हा गडचिरोली गु.र. क्रमांक ३००६/२०१४, कलम ७, १२, १३(१)(ड) सह १३ (२) ला.प्र.का. प्रमाणे गुन्हा नोंद करून नमुद आरोपीतांना अटक करण्यात आली.